**भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळे सत्याग्रह वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी दि.२० मार्च रोजी मौजे महाड, जि.रायगड येथे होणा-या कार्यक्रमस्थळी हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र.विचासं-११२६/प्र.क्र.५८/विमान-१**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक: - १८ मार्च, २०२६

**वाचा:-**१) जिल्हाधिकारी, रायगड या कार्यालयाचे पत्र क्र.गृह/एमएजी-१/पुष्पवृष्टी/ चवदार तळे वर्धापन दिन/२०२६, दि.११.०३.२०२६
२) विमानचालन संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.डीए/एडीएम/२३२/२०२६, दि.१२.०३.२०२६

**प्रस्तावना**

भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळे सत्याग्रहाचा वर्धापन दिन दरवर्षी दिनांक २० मार्च रोजी मौजे महाड,जि.रायगड येथे साजरा करण्यात येतो. सदर वर्धापन दिनानिमित्त होणा-या कार्यक्रमास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हजारो अनुयायी उपस्थित राहतात. सदर कार्यक्रमाच्या वेळी कार्यक्रमस्थळी हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्याबाबतची मागणी अनुयायांकडून दरवर्षी करण्यात येते. यास्तव जिल्हाधिकारी, रायगड यांनी संदर्भाधीन पत्र क्र.१ अन्वये दरवर्षी दि.२० मार्च रोजी मौजे महाड,जि.रायगड येथे होणाऱ्या चवदार तळे सत्याग्रह वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमस्थळी हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्याकरिता विमानचालन संचालनालयास विनंती केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने विमानचालन संचालनालयाने संदर्भाधीन पत्र क्र.२ अन्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळे सत्याग्रह वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी दि.२० मार्च रोजी मौजे महाड,जि.रायगड येथे होणा-या कार्यक्रमस्थळी हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यासाठी शासन आदेश निर्गमित करण्याकरिता प्रस्तावित केले आहे. यानुषंगाने भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळे सत्याग्रह वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी दि.२० मार्च रोजी मौजे महाड, जि.रायगड येथे होणा-या कार्यक्रमस्थळी हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्याकरिताच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळे सत्याग्रह वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी दि.२० मार्च रोजी मौजे महाड, जि.रायगड येथे होणा-या कार्यक्रमस्थळी हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्याकरिता शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर कार्यक्रमस्थळी पुष्पवृष्टी करण्याकरिता विमानचालन संचालनालय, मुंबई यांच्याशी संपर्क साधून हेलिकॉप्टर उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, रायगड यांची राहील. तसेच या प्रयोजनासाठी होणारा खर्च जिल्हाधिकारी, रायगड या कार्यालयाच्या संबंधित आर्थिक वर्षाच्या उपलब्ध निधीमधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६०३१८१७०६५७३४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

APARNA RAJESH CHURI

Digitally signed by APARNA RAJESH CHURI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=f7c51cdde8909e037ec9e7d72236f3e3c46c61072b3926b1521c06f77d1662cb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1D4D6EA1D0CC1ED1FA0FC3C3FEB482175B2BC0C8BCF42B15DD3EE7D5CC3764F8, cn=APARNA RAJESH CHURI
Date: 2026.03.20 13:22:56 +05'30'

(अ. रा. चुरी)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, (सामाजिक न्याय), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण
५. जिल्हाधिकारी रायगड, जि.रायगड
६. संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई
७. तहसिलदार, महाड, ता.महाड, जि.रायगड

**प्रत-**

१. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास व इतर) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उप मुख्यमंत्री ( राज्य उत्पादन शुल्क व इतर) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३.मा.मंत्री व मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४.निवडनस्ती विमान-१ कार्यासन